महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
**कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, ओरोस-सिंधुदुर्गनगरी**
मुख्य प्रशासकिय ईमारत, 'सी' विंग, दालन क्र. ३१२
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्गनगरी पीन-४१६८१२

दूरध्वनी क्र. : ०२३६२-२२८७१७ Email ID : eemido@gmail.com

**जा.क्र. लपाविओ/ प्रशा- ४/ २०६९ /२०२२** **दिनांक :०९ /१२/२०२२**

प्रति,
मा. उप वनसंरक्षक
सावंतवाडी

विषय :- निरुखे लघु पाटबंधारे प्रकल्प, ता. कुडाळ, जि. सिंधुदूर्ग येथील १८.९४ हे. वनजमीन वळती करणाबाबत

संदर्भ :-
१) शासन पत्र क्र.एफएलडी-२०२२/प्र.क्र. २८५/फ-१० महसूल व वनविभाग दि.१७/११/२०२२
२) या विभागाचे पत्र जा.क्र.२९८७ दि.२२/११/२०२२
३) आपले कार्यालयीन पत्र जा.क्र. व/नोसेल कक्ष/नि.पा.प्र./२०२२-२३ /१७६४ दि.३०/११/२०२२

उपरोक्त संदर्भिय शासन पत्रान्वये निरुखे लघु पाटबंधारे प्रकल्प, ता. कुडाळ , जि. सिंधुदूर्ग येथील १८.९४ हे. वनजमीन वळती करणेबाबत प्रस्तावावर खाजगी हक्कधारकांना प्रचलित नियमानुसार मोबदला देण्यासंदर्भात प्रकल्प यंत्रणेचे हमीपत्र सादर करणेबाबत शासनाकडून कळविण्यात आले आहे.

निरुखे लघु पाटबंधारे प्रकल्प, ता. कुडाळ , जि. सिंधुदूर्ग येथील वनजमीन वळती करणे प्रस्ताव १८.९४ हे. असून ९.५५ हे. वनसंज्ञा क्षेत्र व ९.३९ हे. वन क्षेत्र आहे. ९.५५ हे.वनसंज्ञा क्षेत्र हे खाजगी हक्कदारांच्या मालकीचे असून सदर क्षेत्राच्या भूसंपादना करीता भूमीसंपादन, पुनर्वसन, पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये भूसंपादन प्रस्ताव क्र. ५/२०२२ उपजिल्हाधिकारी भूसंपादन जिल्हा मुख्यालय (ल.पा.), सिंधुदुर्ग कार्यालया मार्फत प्रगतीत आहे. सदर अधिनियमानुसार भूसंपादन प्रक्रिया प्रगतीपथावर असून खाजगी हक्कदारांच्या जमिनीच्या प्रस्तावित भूसंपादन प्रक्रिये अंतर्गत सदर खाजगी हक्कदारांना प्रचलित नियमानुसार प्रकल्प यंत्रणेकडून जमिनीचा आवश्यक मोबदला देण्यात येईल.

०९.१२.२२
बारनिशी लिपिक
उपवनसंरक्षक कार्यालय
वनविभाग सावंतवाडी

Scanned with CamScanner

सद्यस्थितीत भूसंपादन २०१३ अधिनियमानुसार भूसंपादन प्रक्रिया प्राथमिक स्थितीत प्रगतीत असून सदर खाजगी व्यक्तींचे सहमतीपत्र घेणे सदर अधिनियमानुसार अपेक्षित नसल्याने सदर सहमतीपत्र सादर करणे बाबत कार्यवाही करता येत नाही.

हे आपल्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

(म. श्री. कदम)
कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे विभाग,
ओरोस, सिंधुदुर्गनगरी.

प्रत:- मा. अधीक्षक अभियंता, दक्षिण कोंकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सिंधुदूर्गनगरी यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत:-उपविभागीय अभियंता, पाटबंधारे बांधकाम उपविभाग क्र.१ कणकवली यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

Scanned with CamScanner